स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# कार्यकारी अभियंता,
# सार्वजनिक.बांधकाम विभाग, कोल्हापूर
# यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. 0231–2651457 | जा.क्र/प्रशा/रस्ते–1/1509/2023 |
| ई–मेल kolhapur.ee@mahapwd.gov.in | दिनांक 22 FEB 2023 |

प्रती,
मा. उपवनसंरक्षक (प्रा)
कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर

विषयः– Proposal for diversion of 0.738 ha. Forest land under Forest (Conservation ) Act-1980 from Manjarwadi to Ghosarwad MDR-92 at Village-Ghosarwad, Tal. Shirol, Dist. Kolhapur (FP/MH/ROAD/143865/2021)

संदर्भः– मा. अपर प्रधान मुख्यवनसरंक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर याचें प्रतिलीपी पत्र कं कक्ष–17/1/नोडल/कोल्हापूर/आयडी–13710/2829 दि. 23/01/2023

संदर्भिय पत्राच्या अनुशंगाने उपस्थित मुद्दयांचा पूर्तता अहवाल आपले कार्यालयास पुढील कार्यवाहीहेतू सविनय सादर करण्यात येत आहे.

वरील बाब आपले माहीतीस्तव व वनसंवर्धन अधिनियमानुसार प्रस्तावाचे पुढील मान्यतेकरीता सादर.

संलग्न–अनुपालन अहवाल

o/c

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
कोल्हापूर

प्रतिलीपीः– अ) मा. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक व केंद्रस्थ अधिकारी (वन बल प्रमुख) महाराश्ट्र राज्य, वनभवन रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स नागपूर यांचे माहीतीस्तव व कार्यवाहीहेतू सादर.
ब) मा. मुख्य वनसंरक्षक प्रा. कोल्हापूर वनवृत्त कोल्हापूर यांचे माहीतीस्तव व कार्यवाहीहेतू सादर.

Scanned with CamScanner

**विषयः—** Proposal for diversion of 0.738 ha. Forest land under Forest (Conservation) Act-1980 From Manjarwadi to Ghosarwad MDR-92 at Village-Ghosarwad, Tal. Shirol, Dist. Kolhapur (FP/MH/ROAD/143865/2021)

## अनुपालन अहवाल

| अनु. कं. | उपस्थित मुद्दे | अनुपालन |
|---|---|---|
| 1 | पृष्ठ कं. 40 वरील GPS Map (Afforestation in degraded forest land) वर प्रमाण (Scale) नमूद केलेले नाही. | पृष्ठ कं. 40 वरील GPS Map (Afforestation in degraded forest land) हा गुगल सॅटेलाईट प्रतिमा असल्यामुळे त्या मॅपला प्रमाण (Scale) नमूद केलेले नाही. |
| 2 | पृष्ठ कं. 104 ते 106 प्रस्तावासोबत जोडलेले नाहीत. त्यामुळे त्या पृष्ठ कंमाकावर काय माहीती आहे त्याचा बोध होत नाही. | पृष्ठ कं. 104 ते 106 या पृष्ठावर कुठलीही माहीती नसल्यामुळे त्याला निरंक गुहीत धरावे. |
| 3 | पृष्ठ कं. 56 तसेच पृष्ठ कं. 62 वर राधानगरी वन्यजीव अभयारण्यापासून प्रकल्पाचे अंतर 62.69 किमी असल्याचे नमूद आहे. परंतू पृष्ठ कं. 117 वर नमूद केलेल्या नकाशात ते अंतर 76.56 कि.मी. असल्याचे दर्शविलेले आहे. त्यामुळे योग्य अंतराबाबत खुलासा सादर करावा. | राधानगरी वन्यजीव अभयारण्यापासून प्रकल्पाचे अंतर 76.56 किमी असल्याचे पृष्ठ कं. 117 नकाशात नमूद असल्याप्रमाणे तेच अंतर योग्य असल्यामुळे पृष्ठ कं. 56 व 62 वर राधानगरी वन्यजीव अभयारण्याचे प्रमाणपत्रात सुधारणा करुन प्रस्तावात जोडण्यात येत आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे. |
| 4 | पृष्ठ कं. 115 वर सादर केलेल्या GEO Digital map चे प्रमाण 1:25000 असे नमूद केलेले आहे. परंतू केंदशासनाचे पत्र कं F.No11:9/98-FC दि.8/7/2011 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावासोबत 1:10000 या प्रमाणावरील (GEO Digital map) नकाशामध्ये प्रस्तावित वळतीकरणाच्या वनजमीन, वनेत्तर जमीन व लगतची जमीन देखील वेगवेगळया रंगात दर्शविण्यात यावी. त्यामध्ये संदर्भ सुची व प्रस्तावीत क्षेत्राकरीता आवश्यक असलेल्या वनजमीनीचे विवरण अंर्तभुत करण्यात यावे. सॅटेलाईट प्रतिमांचा वापर करुन वनच्छादनाची घनता दर्शविण्यात यावी. संपूर्ण विवरणासह संबधित उपवनसरंक्षक आणि प्रकल्प यंत्रणेचे स्वाक्षरीसह (GEO Digital map) नकाशा तीन प्रतीत सादर करण्यात यावा. | GEO Digital नकाशामध्ये प्रस्तावित वळतीकरणाच्या वनजमीन, वनेत्तर जमीन व लगतची जमीन वेगवेगळया रंगाने दर्शविण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ सुची व प्रस्तावीत क्षेत्राकरीता आवश्यक असलेल्या वनजमीनीचे विवरण अंर्तभुत करण्यात आलेले आहे. सॅटेलाईट प्रतिमांचा वापर करुन वनच्छादनाची घनता दर्शविण्यात आलेली आहे. संबधित उपवनसरंक्षक आणि प्रकल्प यंत्रणेचे स्वाक्षरीसह (GEO Digital map) नकाशा आवश्यक प्रतीत सादर करण्यात येत आहे. |
| 5 | प्रस्तावासोबत Cross Section Map सादर केलेला नाही. तो सादर करण्यात यावा. | प्रस्तावासोबत Cross Section Map सादर करण्यात आलेला आहे. कृपया त्याचे अवलोन व्हावे. |

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
कोल्हापूर

Scanned with CamScanner